# श्री.अजयकुमार नष्टे,उपविभागीय अधिकारी, जत उपविभाग जत यांचे न्यायालयात.

दुरध्वनी क्रं. 02344/246134 Email-sdojath5@gmail.com

क्र.आरटीएस/अपील/१२०/२०२३

दिनांक -२४.०२.२०२५

**प्रति,**

१. हुसेनभाई सिकंदर सैय्यद

२. हमीद सिकंदर सय्यद

रा.अलिफ नगर, डिग्रारोड, नवसारी

ता.जि.नवसारी राज्य गुजरात. .... **अपिलार्थी**

**विरुध्द**

१. रोशनबी बादशहा शेख

२. फिरोजखान बादशाह शेख

३. उलफत निजाम सय्यद

४. दिलशाद महंमद शेख

५. शहनाज करीम शेख

६. बालेखान बादशहा शेख मयत वारस

६/१. रझिाया बालेखान शेख

६/२.अलिफ बालेखान शेख

६/३.अरिफा समिर जमादार

६/४.अफरोजा बालेखान शेख

७. शौकत बादशाह शेख मयत वारस

७/१.सद्दामहुसेन शौकत शेख

७/२.जमिन शौकत शेख

७/३.अमीर शौकत शेख

७/४.शायराबी शौकत शेख

८. परवीन शौकत शेख

अ.क्र.१, ६/२, ६/३, ७अ ते ७ड रा. धावडवाडी, ता.जत जि.सांगली

अ.क्र २ रा. नॅशनल ट्रेलर ट्रान्सपोर्ट नगर, पुणे

अ.क्र.६/१ व ६/४ रा.मराठी शाळेच्या जवळ, मलकापूर कराड ता.कराड जि.सातारा

अ.क्र.६/२ रा.२६५/ई, वार्ड बेकरी कॉर्नर,न्यू शाहूपुरी रोड,

कावळा नाका मार्ग ताराबाई पार्ककोल्हापूर

अ.क्र.३ रा. ए १९, अलिफनगर, सोसायटी मिरा रोड नवसारी गुजरात

अ.क्र.४ रा.बागल वस्ती, शिवनगर मलकापूर रोड कराड ता.कराड जि.सातारा

अ.क्र.५ रा.कमला रमन नगर, इंडियन पाईप रोड, वडाळा मुंबई.

अ.क्र.६/२ रा.एसआर १२४/१ नं.४११०४४, सेक्टर नं.२४, प्राधिकरण निगडी पिंपरी चिंचवड

अ.क्र.८ रा.राष्ट्रभुषण हौसिंग सोसायटी,

पोस्ट ऑफिसजवळ रूपीनगर,पुणे शहर पुणे ----- **जाबदार**

**महाराष्ट्र जमीन महसूल अधिनियम १९६६ चे कलम २४७ प्रमाणे**

मौजे धावडवाडी, ता. जत, जि. सांगली येथील गट नंबर ९८ व ९९ या मिळकतीसंदर्भात मंडळ अधिकारी, कुंभारी यांनी फेरफार नंबर ८८१, प्रकरणी दिले आदेशावर व्यथित होऊन प्रस्तुत अपिलार्थी यांनी या न्यायालयात सदरचे अपिल दाखल केलेले आहे.

प्रस्तुत अपिलकामी उभय पक्षकार यांना म्हणणे मांडणेसाठी रितसर नोटीसा देऊन सुनावणीसाठी पुरेशी संधी देण्यात आली.

**अपिलार्थी यांनी प्रस्तुत अपिलकामी दाखल केलेला अपिल मेमो, प्रकरणांतील उपलब्ध कागदपत्रे याचे एकत्रीत अवलोकन करता माझे निष्कर्ष खालीलप्रमाणे आहेत.**

१. मौजे धावडवाडी, ता. जत, जि. सांगली येथील गट नंबर ९८ व ९९ या मिळकतीसंदर्भात मंडळ अधिकारी, कुंभारी यांनी फेरफार नंबर ८८१, प्रकरणी दिले आदेशावर व्यथित होऊन प्रस्तुत अपिलार्थी यांनी या न्यायालयात सदरचे अपिल दाखल केलेले आहे.

२. वास्तविक एखादा खातेदार मयत झालेनंतर त्यांचे सर्व वर्ग एकचे वारस यांची नोंद ७/१२ सदरी करणे क्रमप्राप्त आहे. याठिकाणी कै.बादशहा बबन शेख हे दिनांक १८.१२.२०१२ रोजी मयत झालेनंतर त्यांचे सर्व वर्ग एकच्या वारसांच्या नोंदी झालेचे दिसून येत आहेत. अपिलार्थी यांचे म्हणण्यान्वये अपिलार्थी यांची आई या कै.बादशहा बबन शेख यांच्या मुलगी होत्या. त्यामुळे शरीयत ॲक्ट १९३७ च्या कलम २ अन्वये व पवित्र कुराण या धर्म ग्रंथाच्या सुरा ४ अननिसा आयत ११, १२, १२ व १७७ प्रमाणे अपिलार्थी त्यांची वारस नोंद करणे आवश्यक आहे. वास्तविक अपिलार्थी यांनी कै.रहिमतबानू सिकंदर सय्यद या कै.बादशहा बबन शेख यांची मुलगी असलेबाबतचे कोणतेही कायदेशीर पुरावे सादर केलेले नाहीत. प्रकरणी अपिलार्थी यांनी वंशावळ सादर केलेली असून सदर वंशावळ भारतीय पुरावा कायदयातील तरतूदीनुसार कागदोपत्री पुराव्यासह सिध्द केलेली नाही. अपिलार्थी यांनी दाखल केलेले अपील अर्ज पहाता दिवाणी स्वरूपाचे मुद्दे उपस्थीत करून ०३ वर्ष ०६ महिणे इतक्या विलंबाने तथ्यहीन अपील दाखल करून न्याय मागणेचा प्रयत्न करीत आहेत.

३. विलंबाबाबत म्हणावे तर ०३ वर्ष ०६ महिन्याचे विलंब माफ करावे असे कोणतेही कारण विलंब माफ अर्जात नाही. मुळात अपिलार्थी यांची अपिल अर्जातील मागणी ही दिवाणी स्वरूपाची आहे. त्यासाठी त्यांनी दिवाणी न्यायालयात दाद मागणे आवश्यक आहे. तसेच कोणतेही संयुक्तिक कारण नसतांना केलेला विलब अर्ज कायदयाचे कसोटीवर टिकू शकत नाही. सबब मी, अजयकुमार नष्टे, उपविभागीय अधिकारी जत, उपविभाग जत पुढीलप्रमाणे आदेश पारीत करीत आहे.

**आ दे श**

**निकालपत्रात नमूद कारणास्तव अपिलार्थीचे अपील विलंब माफ अर्जाचे मुद्दयावर फेटाळणेत येत आहे.**

खर्चासंबंधी कोणतेही आदेश नाहीत.

सदर निकालाची समज सर्व संबंधीताना देणेत यावी.

प्रस्तुत निकालपत्र www.eqjcourts.gov.in या वेबसाईटवर पहाणेस उपलब्ध आहे.

(अजयकुमार नष्टे)
**उपविभागीय अधिकारी**
**जत उपविभाग जत**

ठिकाण -जत
दिनांक -२४.०२.२०२५

प्रत- तहसिलदार जत यांना माहितीसाठी व पुढील कार्यवाहीकरिता रवाना.